# महाराष्ट्रातील अस्वस्थ युवांसाठी आवाहन : निर्माण

शिक्षण-नोकरी-निवृत्ती याहूनही वेगळं जीवनात काही असतं का? केवळ स्वतःचं घर पैशाने भरणं या पेक्षा अधिक अर्थपूर्ण जीवन शक्य आहे का? माझ्या कौशल्यांचा व क्षमतांचा मी समाजासाठी कसा उपयोग करु शकतो?

असे प्रश्न तुम्हाला छळतात का?

महाराष्ट्रातील अशा अस्वस्थ युवांनी स्वतःचा व स्वतःच्या भवितव्याचा शोध घ्यावा यासाठी सुरु केलेली शिक्षण प्रक्रिया म्हणजे निर्माण

आजचे अर्थलोभी वातावरण व निव्वळ परीक्षार्थी शिक्षण या मधून निघालेल्या तरुणांचा 'करियर आणि पैसा' यांच्या चढाओढीत अभिमन्यू झाला आहे. याहून अधिक समृध्द, समाधानी व उद्देश्यपूर्ण अशा जीवनापासून ते वंचित होत आहेत.

दुसरीकडे विविध सामाजिक, वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रश्न सोडविण्याचे आव्हान घ्यायला इच्छूक व सक्षम असे युवा 'चेंज मेकर्स' नाहीत.

फक्त सुखासीन हतबलता किंवा दिशाहीन कृती यांच्या चक्रात न अडकता 'मी कशासाठी जगायचं' याचं खरं उत्तर शोधण्याची शिक्षण प्रक्रिया म्हणजे निर्माण.

- १८-२६ वयोगटातील निवडक ६० तरुण-तरुणींसाठी
- सहा महिन्यातून एकदा अशी दोन वर्षात चार शिबिरांची मालिका
- प्रत्येक शिबीर सुमारे ७-९ दिवसांचे
- अनुभवात्मक शिक्षणावर भर
- समाजातील समस्यांचे प्रत्यक्ष दर्शन
- महाराष्ट्रातील अनेक तज्ञ व प्रख्यात व्यक्तित्वांसोबत चर्चा व मार्गदर्शन
- शिबीरांचे ठिकाण :- 'शोधग्राम' सर्च , गडचिरोली
- संयोजनः डॉ. अभय व डॉ. राणी बंग, श्री. दत्ता बाळसराफ आणि निर्माण टीम

निर्माणबाबत अधिक माहितीसाठी :- http://nirman.mkcl.org

आपले,

अभय व राणी बंग    अनिल अवचट    विवेक सावंत    विजय भटकर